शुक्रवार दि. १३ मार्च २०१५

नवप्रभा

# पश्चिम घाट-जागतिक वारसा; दोडामार्ग महाविद्यालयात चर्चासत्र

दोडामार्ग (न. प्र.)

दोडामार्ग (जि. सिंधुदुर्ग) येथील नवनिर्माण शिक्षण संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतीय सामाजिक अनुसंधान परिषद (आय.सी.एस.एस.आर) मुंबईच्या वतीने दि. २६ व २७ मार्च रोजी 'पश्चिम घाट- जागतिक वारसा, पर्यावरण आणि विकास' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. युनेस्कोने अलिकडेच पश्चिम घाटाचे जागतिक पर्यावरणीय दृष्ट्या महत्व लक्षात घेऊन जागतिक वारसा यादीत पश्चिम घाटाचा समावेश केलेला आहे. या पार्श्वभूमीवर दक्षिण भारताच्या व महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने पश्चिम घाटाचा कशा पध्दतीने उपयोग करता येईल याचा अभ्यास, चिंतन व मनन व्हावे हा उद्देश समोर ठेवून चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

या चर्चासत्रात महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळ, पश्चिम बंगाल बरोबरच देशाच्या अन्य राज्यातील १०० पेक्षा अधिक पर्यावरण अभ्यासक यामध्ये सहभागी होणार आहेत. चर्चासत्राचा प्रारंभ गुरुवार दि. २६ मार्च २०१५ रोजी सकाळी १० वाजता होणार असून या चर्चासत्राच्या उद्घाटनासाठी गोव्याचे मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर याना निमंत्रित करण्यात आले आहे, तर शुक्रवार दि. २७ मार्च रोजी होणाऱ्या समारोप समारंभास पर्यावरण चळवळीतील अग्रणी प्राचार्य डॉ. एम. आय. बाचुळकर उपस्थित राहणार आहेत. या चर्चासत्राचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे तर सहसमन्वयक म्हणून प्रा. एस. एन. जाधव हे जबाबदारी पार पाडणार आहेत. चर्चासत्रामध्ये सहभाग नोंदणीसाठी प्रा. एस. एन. जाधव (९८८१५६०५९६) व प्रा. श्रीपाद पाडगावकर (९४२३६८७७४४) यांच्याशी संपर्क साधावा.